## नि.दि.मु.क्र. ३८/२०१४ मधील निशाण ६३ वरील आदेश

०१. सदरील अर्ज प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्याविरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश व ताकीद अर्जावर म्हणणे नाहीचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १० व ११ यांचे असे म्हणणे आहे की, त्या गृहिणी आहेत. कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना दाव्यास कैफियत देणेसाठी व ताकीद अर्जास म्हणणे देणेसाठी आवश्यक असलेले कागदपत्र सरकारी कार्यालयातून उपलब्ध करुन घेणे शक्य झालेले नव्हते. त्यामुळे प्रस्तुत दाव्याच्याकामी विहीत मुदतीत कैफियत व ताकीद अर्जास म्हणणे दाखल करणे त्यांना शक्य झालेले नव्हते. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विनाकैफियतचा व विना म्हणण्याचा आदेश पारीत केलेला आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे की, त्यांनी कैफियत व ताकीद अर्जास म्हणणे सादर करण्यास जाणीवपुर्वक विलंब अथवा हेळसांड केलेली नाही. न्यायालयाचा बहुमोल वेळ वाया घालण्याचा त्यांचा कोणताही अप्रमाणिक प्रयत्न नव्हता. न्यायपुर्ततेच्या दृष्टीने त्यांनी अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे.

०२. सदरील अर्जास वादी याने हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी दिलेला अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जातील कारण खोडसाळ आहे. अर्जातील कारण मोघम व बीन बुडाचे आहे. ताकीद अर्जास व कैफियत देण्याकरीता आवश्यक असलेले कोणते कागदपत्र कोणत्या कौटुंबिक अडचणीमुळे मिळविणे शक्य झालेले नाहीत याचा कोणताही ऊहापोह अर्जात होत नाही. तसेच आवश्यक कागदपत्रे मिळविण्याकरीता कधी अर्ज केला व ती कधी मिळाली याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आलेला नाही. कायद्याने नेमून दिलेले मुदतीचे बंधन दूर व्हावे व वादातील आदेश रद्द होवून मिळावा या करीता कोणताही योग्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर नाही. अर्जावरुन प्रतिवादी यांचा अप्रमाणिक हेतू स्पष्टपणे दिसून येणारा आहे. अर्ज मंजूर झाल्यास कायदेशीर तरतुदींची पायमल्ली होणारी आहे. त्यामुळ अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०३. सदरील प्रकरणाचे अवलोकन करता ही गोष्ट स्पष्ट आहे की, प्रतिवादी क्र. १० व ११ यांना समन्सची बजावणी होवून देखील त्यानंतर त्यांनी विहीत मुदतीत कैफियत व म्हणणे न दाखल केल्यामुळे त्यांच्याविरुध्द कैफियत नाही व म्हणणे नाही असा हुकुम पारीत केला गेला. मान. सर्वोच्च न्यायालयाने कैफियत विलंब माफीसाठी काही मार्गदर्शक तत्वे खालील न्यायनिवाडयात स्पष्ट केलेले आहे.

***Rani Kusum VersusKanchan Devi2005 AIR(SC) 3304*** : wherein the Honble Supreme Court have held that, the purpose of providing the time schedule for filing the written statement under Order VIII Rule 1 CPC is to expedite and not to scuttle the hearing. The provision spells out a disability on the defendant. It does not impose an embargo on the power of the Court to extend the time. Though the language of the proviso to Rule 1 Order VIII CPC is couched in negative form, it does not specify any penal consequences flowing from the non-compliance. The provision being in the domain of the procedural law, it has to be held directory and not mandatory. The power of the Court to extend time for filing the written statement beyond the time schedule provided by Order VIII Rule 1 CPC is not completely taken away. Costs may be imposed and affidavit or documents in support of the grounds pleaded by the defendant for extension of time may be demanded, depending on the facts and circumstances of a given case. The use of the word shall in Order VIII Rule 1 by itself is not conclusive to determine whether the provision is mandatory or directory. We have to ascertain the object which is required to be served by this provision and its design and context in which it is enacted. The use of the word shall is ordinarily indicative of mandatory nature of the provision but having regard to the context in which it is used or having regard to the intention of the legislation, the same can be construed as directory. The rule in question has to advance the cause of justice and not to defeat it. Construction of the rule or procedure which promotes justice and prevents miscarriage has to be preferred. The rules or procedure are handmaid of justice and not its mistress. Strict interpretation would defeat justice.

०४. सदरील मार्गदर्शक तत्वांचा विचार करता तसेच प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी दिलेले कारण की त्या गृहिणी आहेत. कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना दाव्यास कैफियत देणेसाठी व ताकीद अर्जास म्हणणे देणेसाठी आवश्यक असलेले कागदपत्र सरकारी कार्यालयातून उपलब्ध करुन घेणे शक्य झालेले नव्हते. हे कारण पटण्यासारखे आहे कारण गृहिणींवर अनेक सांसारिक व इतर जबाबदा—या असतात. त्यामुळे कौटुंबिक अडचणींमुळे त्यांना जास्त वेळ मिळत नाही. वादीच्या वकिलांचा आक्षेप की, नेमके कोणते कागदपत्र प्रतिवादींना मिळाले नाहीत याबाबत त्यांनी सविस्तर

खुलासा त्यांच्या अर्जात केलेला नाही. परंतु नि.क्र. ६३ च्या अर्जामध्ये प्रतिवादींनी दाव्याच्या कैफियत व ताकीद अर्जास आवश्यक असलेले कागदपत्र सरकारी कार्यालयातून उपलब्ध करुन घेणे शक्य झाले नाही असे स्पष्ट नमूद केले आहे. त्यामुळे वादींच्या वकिलांचा आक्षेप संयुक्तीक वाटत नाही. आवश्यक त्या माहिती व कागदोपत्री पुराव्याअभावी वकिलांदेखील म्हणणे दाखल करणे शक्य नाही. सरकारी दप्तरातील कागदपत्रे मिळण्यास विलंब लागतो कारण त्यांच्याकडे लोकहिताची बरीच इतर कामेही असतात. वादी यांनी सदरील दावा हा कायम व आज्ञापक ताकिदीकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. दोन्ही पक्षकारांचे हक्क त्यात अंतर्भूत आहेत तसेच प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्याविरुध्द दाद मागितलेली असल्यामुळे, सदरील दावा हा गुणदोषांवर चालण्यासाठी प्रतिवादी क्र. १० व ११ यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातूनही एखाद्या पक्षकाराला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १० व ११ यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतल्यास वादीचे काहीही नुकसान होणारे नाही. उलट त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील वाद एकाच प्रकरणात निकाली होण्यासाठी मदत होईल व त्यामुळे त्यांच्यात अनावश्यक इतर प्रकरणे होणार नाहीत. प्रतिवादी क्र. १० व ११ यांची कैफियत दाखल करुन घेणे न्यायाच्या दृष्टीकोनातून व दावा गुणदोषावर चालविण्यासाठी आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी केलेला सुमारे ०२ वर्षाचा विलंब लक्षात घेता त्यांच्यावर खर्च बसविणे देखील आवश्यक आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.क्र. ६३ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्या विरुध्दचा झालेला विना कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जावर म्हणणे नाहीचा आदेश रक्कम रु. ४००/— खर्च देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी सदरील खर्च रूपये ४००/— वादीला एकत्रीतरित्या द्यावेत.

४. प्रतिवादी क्र. १० व ११ यांची कैफियत व तुर्तातुर्त ताकिदीवर म्हणणे खर्च भरल्यानंतर पटलावर घेण्यात येईल.

सही/—

दिनांक :— ०६/१२/२०१६

( एस.एच.पन्हाळे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण